# बृहन्मुंबई महानगरपालिका

कॉम्प्रिहेन्सिव थॅलासेमिया केअर, बालरोग रक्तदोष - कर्करोग आणि
बोन मॅरो ट्रान्सप्लान्टेशन केंद्र, बोरिवली (पू.)
**(लो.टि.म. वैद्यकिय महाविद्यालय व सर्वसाधारण रुग्णालय, शीव, मुंबई यांचे उपकेंद्र)**

क्र. एलटीएच/931/सीटीसी, पीएचओ आणि बीएमटी दि. 11/08/2022

## जाहिरात

लोटिमस रुग्णालया अंतर्गत मनपा - कॉम्प्रिहेन्सीव थॅलासेमिया केअर, बालरोग रक्तदोष - कर्करोग आणि बोन मॅरो ट्रान्सप्लान्टेशन केंद्र, बोरीवली (पू) येथील अति विशेष उपचार व सेवा केंद्रासाठी खालील नमूद केलेली पद कंत्राटी तत्त्वावर 1 वर्षाच्या कालावधीसाठी दर 6 महिन्यांनी 1 दिवस तांत्रिक सेवा खंड सापेक्ष भरावयाची आहेत. यासाठी इच्छूक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. विहीत नमुन्यातील अर्ज http://www.ltmgh.com या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. अनु क्रं. 1 ते 3 पदासाठी रू. 300 + 18% GST, इतके अर्ज शुल्क मनपा - कॉम्प्रिहेन्सिव थॅलासेमिया केअर, बालरोग रक्तदोष - कर्करोग आणि बोन मॅरो टान्सप्लान्टेशन केंद्र, बोरीवली (पूर्व) मुंबई - 400066 येथे दि. 12/08/2022 ते दि. 23/08/2022 पर्यत कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी (शनिवार, रविवार व सार्वजनिक सुटटी वगळून) स.10.00 ते दु. 01.00 या वेळेत विहीत नमून्यात अर्ज व आवश्यक शैक्षणीक अर्हता प्रमाणपत्र, अनुभव प्रमाणपत्र इत्यादी. अर्जासोबत जोडून मनपा - कॉम्प्रिहेन्सिव थॅलासेमिया केअर, बालरोग रक्तदोष - कर्करोग आणि बोन मॅरो ट्रान्सप्लान्टेशन केंद्र, पहिला मजला, कनाकिया एक्सॉटिका समोर, सीसीआय कंपाऊंड, बोरीवली (पू.) मुंबई- 400066. येथे सादर करावा. (दुरध्वनी क्र. 022- 28541017/18).

| अनु क्र. | पदाचे नाव | अर्हता | पद संख्या | ठोक वेतन दरमहा (रू.) |
|---|---|---|---|---|
| 1 | मानसेवी बालरोग शल्यक्रिया तज्ञ (Visiting Consultant Pediatric Surgeon) | M.Ch Pediatric Surgery / DNB Pediatric Surgery/ Fellowship in Pediatric Surgery<br>Or<br>MCI recognized equivalent degree | 01 | 20,000 |
| 2 | मानसेवी ॲनेस्थेटिक्स (Visiting Anesthetics ) | DM/ DNB (Anestheology)<br>Or<br>MCI recognized equivalent degree | 01 | 20,000/- |
| 3 | मानसेवी बालरोग ह्दयारोग तज्ञ (Visiting Pediatric Cardiologist) | DM / DNB (Cardiology) / MD (Ped) with Fellowship in Pediatric Cardiology<br>Or<br>MCI recognized equivalent degree | 01 | 20,000/- |

**वयोमर्यादा:-**

1. मानसेवी बालरोग शल्यक्रिया तज्ञ (Visiting Consultant Pediatric Surgeon)- कमाल 50 वर्ष
2. मानसेवी ॲनेस्थेटिक्स (Visiting Anesthetics) - कमाल 50 वर्ष
3. मानसेवी बालरोग ह्दयारोग तज्ञ (Visiting Pediatric Cardiologist) - कमाल 50 वर्ष.

**सर्वसाधारण अटी:-**

1. संबंधित विषयातील आवश्यक ती पदवी किंवा पदविका प्राप्त केल्यानंतर उमेदवारास व्यावसायिक अनुभव असल्यास प्राधान्य दिले जाईल.
2. उमेदवार महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची परीक्षा वा तत्सम किमान 100 गुणांची प्रश्नपत्रिका असलेली मराठी विषय घेऊन उत्तीर्ण झालेला असावा.
3. उमेदवाराने संगणकाचे ज्ञान किंवा महाराष्ट्र राज्य उच्च आणि तांत्रिक शिक्षण मंडळाचे MS-CIT OR GECT चे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक आहे. किंवा नेमणूक झाल्यावर दोन वर्षांच्या कालावधीत संगणक विषयक उपरोक्त अर्हता प्राप्त करणे आवश्यक आहे अन्यथा उमेदवाराची नियुक्ती रदद करण्यात येईल.
4. उमेदवारांनी विवाह नोंदणी प्रमाणपत्र, नावात बदल झाल्याचे राजपत्र सादर करावे. तसेच ते नसल्यास विवाहित महिला उमेदवार विवाहा पूर्वीच्या नावाने अर्ज करू शकतात.
5. उमेदवाराला कोणत्याही न्यायालयाने नैतिक अध:पतन किंवा फौजदारी स्वरुपाच्या खटल्यात शिक्षा दिली असल्यास, तसेच उमेदवाराविरुद्ध पोलिस चौकशी/न्यायालयिन प्रकरण प्रलंबित असल्यास/शिक्षा झालेली असल्यास उमेदवाराने त्याबाबत माहिती देणे आवश्यक आहे निवडप्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने चुकीची माहिती/ प्रमाणपत्र कागदपत्रे सादर केल्यास किंवा कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्याची उमेदवारी रद्दबातल करण्यांत येईल. तसेच नियुक्ती झालेली असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता त्याची नियुक्ती समाप्त करण्यांत येईल.
6. उमेदवार नोकरी करीत असल्यास पूर्वीच्या नियोक्त्यांचे ना हरकत प्रमाणपत्र अर्जासोबत जोडावे.
7. प्रशासकीय किंवा अन्य कारणास्तव निवड प्रक्रिया कोणत्याही वेळेस कोणत्याही टप्प्यावर थांबविण्याचे अधिकार महानगरपालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना आहेत.
8. उमेदवारांना मुलाखतीसाठी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.
9. निवड झालेल्या उमेदवारास रुपये 100/- किंवा विधी आकाराप्रमाणे (वेतन मिळकतीनुसार) बॉन्ड पेपरवर विहित नमुन्यातील कंत्राट करार करणे आवश्यक असून सदरहू खर्च संबंधित उमेदवारास करावा लागेल.
10. निवड झालेल्या उमेदवाराविरुध्द कोणताही गुन्हा नोंदविलेला नाही अथवा सिध्द झालेला नाही असे चारित्र्य प्रमाणपत्र संबंधित पोलीस स्टेशनकडून नेमणुकी नंतर एक महिन्याच्या आंत सादर करणे आवश्यक व बंधनकारक अथवा त्यांची नियुक्ती रद्द करण्यात येईल.
11. सदर कंत्राटी तत्त्वावरील पदधारकांची नियुक्ती कोणत्याही वेळी पूर्वसूचना न देता रद्द करण्याचे अधिकार बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्तांना आहेत.
12. सदर कंत्राटी तत्त्वावरील पदधारकाच्या नियुक्ती कालावधीमध्ये उमेदवाराने शिस्तभंग केल्याचे निदर्शनास आल्यास त्यांची नियुक्ती तात्काळ रद्द करण्यांत येईल.
13. कुठल्याही कारणास्तव निवड झालेल्या उमेदवारास पदाचा राजीनामा द्यावयाचा असल्यास त्याने 30 दिवसांची पूर्वसूचना देणे बंधनकारक आहे.
14. उमेदवारास नियुक्त केलेल्या विभागातील सत्रांनुसार साप्ताहिक रजा अनुदेय असेल त्या व्यतिरिक्त कोणत्याही कारणास्तव रजा घ्यावयाही असेल तर आपल्या विभागातील वरिष्ठांना त्याबाबत माहिती देणे आवश्यक असेल.
15. उमेदवारास रुग्णालयात तीन पाळीमध्ये चक्रांकीत पध्दतीने काम करावे लागेल.

**विशेष सुचना:**

1. यापूर्वी संबंधित कार्यालयात व अन्य ठिकाणी सादर केलेले/प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेने कोणत्याही व्यक्तीला व इतर दुस-या संस्थेला अर्ज विकणे, स्विकारणे इत्यादींचा अधिकार दिलेला नाही याची कृपया नोंद घ्यावी.
2. टपालाने / कुरिअरने /ई-मेलद्वारे आलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाही.
3. अर्जाचे विहित मुल्य भरुन त्याची पावती सोबत जोडल्याशिवाय अर्ज ग्राह्य धरण्यात येणार नाहीत.

अर्जाचे विहित (अनु क्रं. 1 ते 3 पदासाठी रू. 300 + 18% GST इतके) अर्ज शुल्क मनपा - कॉम्प्रिहेन्सिव थॅलासेमिया केअर, बालरोग रक्तदोष कर्करोग आणि बोन मॅरो ट्रान्सप्लान्टेशन केंद्र, पहिला मजला, कनाकिया एक्सॉटिका समोर, मागाठाणे, बोरिवली (पू.) मुंबई - 400066 येथे दि. **12/08/2022** ते दि. **23/08/2022** रोजी (सार्वजनिक सुट्टी व रविवार वगळून) (स. 10.00 ते दु. 01.00 पर्यंत) भरून, त्याची पावती अर्जासोबत जोडावी. विहित नमुन्यात आवश्यक शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्रे व अनुभव प्रमाणपत्र तसेच अर्ज शुल्क पावती जोडल्या शिवाय अर्ज ग्राह्य धरण्यात येणार नाही.

इच्छुक उमेदवारांनी विहित नमुन्यातील सर्व बाबींची पूर्तता केलेले अर्ज, सर्व प्रमाणपत्रांच्या छायांकित प्रतीसह, अलीकडेच काढलेले पासपोर्ट छायाचित्र त्यावर चिकटवुन मनपा-कॉम्प्रिहेन्सिव थॅलेसिमीया केअर, बालरोग रक्तदोष-कर्करोग आणि बोन मॅरो ट्रान्सप्लान्टेशन केंद्र, पहिला मजला, कनाकिया एक्सॉटिका समोर, सीसीआय कंपाऊंड, बोरिवली (पू.) मुंबई - 400 066. (दुरध्वनी क्र. 022-28541017/ 18) येथे दि. **25/08/2022** रोजी स. 10.00 वाजता सर्व मुळ प्रमाणपत्रासहीत मुलाखतीसाठी स्वखर्चाने उपस्थित रहावे.

| | | |
|---|---|---|
| **Sd/-**<br>**संचालक,**<br>**मनपा - सीटीसी, पीएचओ आणि बीएमटी केंद्र, बोरिवली (पू.)** | **Sd/-**<br>**अधिष्ठाता**<br>**लो.टि.म.स. रुग्णालय** | **Sd/-**<br>**संचालक (वै.शि. व प्र.रु.)** |